

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ४६ ▪ शनिवार १४ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

तोफखाना पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक अखेर कार्यान्वित

आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; वाढत्या गुन्हेगारीला वेसण घालण्याचे नव्या पथकासमोर आव्हान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– गेल्या दीड महिन्यांपासून रखडलेले तोफखाना पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक (डीबी) अखेर आज (दि. १४) कार्यान्वित करण्यात आले आहे. दिवाळीच्या दरम्यान सावेडी परिसरासह हद्दीत वाढलेली गुन्हेगारी आणि घरफोड्यांच्या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्याची दखल घेत आता तोफखान्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांना उपरती झाली असून, नव्याने गठीत केलेल्या या पथकावर आता गुन्हेगारांची कुंडली काढण्याबरोबरच गुन्हेगारी रोखण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

दिवाळी सणाच्या दरम्यान तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गुन्हेगारीने अक्षरशः डोके वर काढले होते. विशेषतः सावेडी परिसरात घरफोड्यांचे सत्र सुरू होते, तसेच शरीराविरुद्धच्या इतरही गंभीर गुन्हेगारी घटना सातत्याने घडत होत्या. आश्चर्याची बाब म्हणजे, अशा संवेदनशील परिस्थितीत गेल्या दीड महिन्यांपासून या पोलीस ठाण्याला गुन्हे शोथ (डीबी) पथकच नव्हते. त्यामुळे चोरांचे आणि गुन्हेगारांचे चांगलेच फावले होते.

तोफखाना हद्दीतील या वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांच्यासह शिष्टमंडळाने थेट पोलीस अधीक्षकांची भेट घेतली होती. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली होती. या राजकीय आणि सामाजिक दबावानंतर यंत्रणा हलली. दीड महिन्याच्या खंडानंतर पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी आज एका अधिकृत आदेशाद्वारे ११ अंमलदारांचे नवे गुन्हे शोध पथक कार्यान्वित केले आहे.

काय आहेत नव्या पथकाला आदेश?

नव्याने नेमणूक झालेल्या या पथकातील अंमलदारांनी हद्दीत दाखल झालेल्या मालाविरुद्ध तसेच शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणावेत, फरार व पाहिजे आरोपींना तातडीने जेरबंद करावे, जास्तीत जास्त रात्रगस्त करून गुन्ह्यांना प्रतिबंध करावा आणि हद्दीतील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करावे, असे सक्त आदेश पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी दिले आहेत.

नवे गुन्हे शोध पथक याप्रमाणे –

१ शेख तनवीर महंमदअली (सफौ) २ गणेश शिवाजी साठे (पोहेकॉ) ३ अब्दुलकादर परवेज इनामदार (पोहेकॉ) ४ भागवत मच्छिंद्र बांगर (पोकॉ) ५ बाळासाहेब बाबासाहेब भापसे (पोकॉ) ६ सतीश मारुती शिंदे (पोकॉ) ७ अमोल दिलीप गाडे (पोकॉ) ८ महेश बाळासाहेब शेळके (पोकॉ)प ९ दादासाहेब दत्तात्रय रोहोकले (पोकॉ) १० कपिल श्रीराम गायकवाड (पोकॉ) ११ कल्पना एकनाथ अवसरे (मपोकॉ)

सावेडीतील भोरमळ्यात जागेच्या वादातून

महिलांची टोळी पाठवून ताबेमारीचा प्रयत्न

मुख्य सूत्रधार अमोल निक्रडसह १५ महिलांवर तोफखाना पोलिसांत गुन्हा दाखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सावेडी उपनगरातील भोरमळा परिसरात जागेच्या वादातून एका व्यक्तीने चक्क २० ते २५ महिलांची टोळी पाठवून ताबेमारी करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या महिलांनी हातात कुऱ्हाडी व इतर हत्यारे घेऊन एका शेडची तोडफोड केली. तसेच पोलिसांवर दबाव आणण्यासाठी स्वतःचेच कपडे फाडून विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात मुख्य सूत्रधार अमोल निक्रड याच्यासह १५ हून अधिक महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मुख्य आरोपी अमोल निक्रड

याप्रकरणी बहिरुनाथ मच्छिंद्र भोर ▪ पान ४ वर

गुन्हा दाखल झालेले आरोपी

१) अमोल दिलीप निक्रड (मुख्य सूत्रधार, रा. गणेश चौक, बोल्हेगाव) २) रेखा ज्ञानेश्वर चव्हाण (वय ३०, रा. बुरुडगाव रोड) ३) रशिना सावता चव्हाण (वय ३२, रा. बुरुडगाव रोड) ४) निस्ता अतिष काळे (वय २५, रा. बुरुडगाव रोड) ५) भिरको रसम भोसले (वय ५०, रा. बुरुडगाव रोड) ६) पूनम तुषार भोसले (वय २०, रा. बुरुडगाव रोड) ७) उमा दिपक भोसले (वय ३०, रा. विळद, ता. जि. अहिल्यानगर) ८) शिल्पा कुणाल काळे (वय २७, रा. बुरुडगाव) ९) सारिका अंतुश काळे (वय २८, रा. बुरुडगाव) १०) करुणा बडुद भोसले (वय ५५, रा. बुरुडगाव) ११) सोनाली दग्गु भोसले (वय ३०, रा. बुरुडगाव) १२) अश्विनी अक्षय चव्हाण (वय ३५, रा. बुरुडगाव) १३) सीमा विशाल काळे (वय २०, रा. बुरुडगाव) १४) काजल राम चव्हाण (वय २६, रा. बुरुडगाव) १५) दीपाली हेमंत भोसले (वय ४५, रा. बुरुडगाव) १६) सपना बंटी भोसले (रा. गुंडेगाव, ता. जि. अहिल्यानगर) तसेच इतर ४ ते ५ अनोळखी साथीदार महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाला सुप्रिया सुळें यांच्याकडून पूर्णविराम

मुंबई – राज्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत आणि एनडीएसोबत सत्तेत जाण्याच्या चर्चांवरती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन सविस्तरपणे भाष्य केले. यावेळी सुळे म्हणाल्या, एनडीए सोबत जाण्याची चर्चा नाही. जिथे चर्चा नाही तिथ कॉमा, फुलस्टॉप विषय येत नाही. एसए लिहिला नाही तर त्याबाबत का बोलायचं? अशा शब्दात विलीनीकरणाच्या चर्चांना फुलस्टॉप लावला आहे.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, विलीनीकरणाच्या चर्चांचा मला आता कंटाळा आला आहे. माझा भाऊ (अजित पवार) होता तोपर्यंत विलिनकरणाची चर्चा होती, तारीखही ठरली होती. ज्या दिवशी माझा भाऊ गेला, त्या दिवशी विलीनीकरणाबाबत माझ्या मनात, माझ्या पक्षात फुल स्टॉप झाला, ज्या दिवशी संघटनेतील पदाधिकारी आणि माझा अजितदादा यांच्याशी चर्चा झाली होती. त्याचे व्हिडीओ पण तुम्ही दाखवले. माझा भाऊ होता तोपर्यंत विलीनीकरणाची चर्चा होती. ज्या दिवशी भाऊ गेला त्या दिवशी विलीनीकरणाला फुल स्टॉप झाला. आमच्याकडून एकही स्टेटमेंटनंतर केलेलं नाही. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जे स्टेटमेंट आली त्याला आम्ही काऊंटर केलेलं नाही. जे आमचं पुढे जायचं ठरलं होतं, ते अजितदादांसोबत ठरलं होतं. काही गोष्टी हृदयातूनही होतात, विलीनीकरणाच्या चर्चांवर आज जे काही आहे ते प्रश्न विचारुन टाका, आज काय ते होऊन जाऊ द्या. यापुढे मी विलिनिकरणावर बोलणार नाही. या चर्चांवरुन मला कंटाळा आला आहे, असंही सुप्रिया सुळेंनी स्पष्ट ▪ पान ४ वर

एलसीबीचे एकाच दिवशी जिल्ह्यात १६ ठिकाणी छापे

अवैध धंद्यांवर कारवाईत दोन लाखांचा मुद्देमाल जप्त







दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी जिल्ह्याभरात मोहीम राबवत एकाच दिवशी तब्बल १६ ठिकाणी छापे टाकले. दिनांक १३ नोव्हेंबर रोजी राबविण्यात आलेल्या या कारवाईत २ लाख ३ हजार ३३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यात अवैध जुगार, दारू आणि गुटखा विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. याची दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेची ५ विशेष पथके तयार करण्यात आली. या पथकांनी कर्जत, तोफखाना, राहुरी, पारनेर आणि लोणी या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी छापे टाकले. यामध्ये जुगाराचे ३ गुन्हे, अवैध दारू विक्रीचे १२ गुन्हे आणि गुटखा विक्रीचा १ असे एकूण १६ गुन्हे संबंधित पोलीस ठाण्यांत दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी जुगार अड्ड्यांवरून ▪ पान ४ वर

पथकात यांचा सहभाग

या कारवाईत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, प्रताप देवकाते, रोहित मिसाळ, भाऊसाहेब काळे, गणेश लोंढे, विशाल तनपुरे, योगेश कर्डीले, अजिनाथ पाखरे, सुयोग सुपेकर, संतोष खैरे, पंकज व्यवहारे, अमृत आढाव, विजय पवार, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, भगवान थोरात, सुनील मालणकर, अतुल लोटके, विष्णू भागवत, अमोल आजबे आणि प्रकाश मांडगे यांनी सहभाग घेतला.

दिवाळी सण अग्रीम न मिळाल्याने महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष

कामगार युनियनचा २३ नोव्हेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

सण अग्रीमसह १३० कोटींपेक्षा अधिक थकीत देणी देण्याची मागणी; आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाराष्ट्रातील विविध शासकीय कार्यालयांमधील तसेच महानगरपालिकांमधील कर्मचाऱ्यांना दिवाळी सणापूर्वी सण अग्रीम दिले जाते. मात्र, अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाकडून यंदा कर्मचाऱ्यांना अद्याप सण अग्रीमची रक्कम देण्यात आलेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सण अग्रीमसह कर्मचाऱ्यांच्या विविध थकीत देणी मिळावीत, या मागणीसाठी महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने २३ नोव्हेंबर २०२६ पासून आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी दिली.

युनियनने निवेदनात म्हटले आहे की, दिवाळी सणानिमित्त कर्मचाऱ्यांना सण अग्रीम मिळावे, यासाठी संदर्भीय पत्र तसेच शासन निर्णयांच्या आधारे यापूर्वीच प्रशासनाकडे मागणी करण्यात आली होती.



याबाबत प्रशासनाशी चर्चाही झाली होती. मात्र, दिवाळी सण संपूनही अद्याप सण अग्रीमची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

सण अग्रीमबाबत वेळोवेळी संपर्क साधला असता आयुक्त व महानगरपालिकेतील इतर अधिकारी वसुलीचे कारण पुढे करून पैसे उपलब्ध नसल्याचे सांगतात. त्यामुळे सण अग्रीमची रक्कम देणे शक्य नसल्याचे प्रशासनाकडून कळविण्यात येत असल्याचे युनियनने निवेदनात नमूद केले आहे.

मागील वर्षी म्हणजेच १ एप्रिल २०२५ ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत झालेली वसुली आणि चालू वर्षी १ एप्रिल २०२६ ते १२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत झालेली वसुली पाहता दोन्ही वर्षांतील वसुली जवळपास सारखीच आहे. असे असतानाही मागील वर्षी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सण अग्रीम, कालबद्ध पदोन्नती तसेच इतर देणी अदा केली होती. यंदा मात्र निवडणूक कार्यक्रम, जनगणना कार्यक्रम, एस.आय.आर. यांसारखी अतिरिक्त कामे करूनही वसुली कर्मचाऱ्यांनी मागील वर्षाच्या तुलनेत चांगली वसुली केली आहे. असे असतानाही जाणीवपूर्वक सण अग्रीम अदा न करून कामगार-कर्मचाऱ्यांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

महानगरपालिका कर्मचाऱ्यांची अनेक वर्षांपासून विविध आर्थिक देणी प्रलंबित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामध्ये कोर्ट कर्मचारी व हद्दवाढीतील कर्मचाऱ्यांचा पाचव्या वेतन आयोगाचा फरक, सेवानिवृत्त व कायम कर्मचाऱ्यांचा सहाव्या वेतन आयोगाचा फरक, कालबद्ध पदोन्नतीस पात्र असलेल्या कामगार-कर्मचाऱ्यांचा फरक, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान, शिल्लक रजेचा पगार आणि भविष्य निर्वाह निधीच्या रकमा वेळेवर अदा केल्या जात नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. ▪ पान ४ वर

तब्बल ४० वर्षांनंतर अहिल्यानगरमध्ये राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचा थरार

२८ नोव्हेंबरपासून ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद स्पर्धा; राज्यातील ४८ संघांचा सहभाग

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– तब्बल चार दशकांनंतर अहिल्यानगर शहराला पुन्हा एकदा पुरुष व महिला गटातील राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे यजमानपद मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य क्रीडा मंडळ, निर्मलनगर यांच्या वतीने ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२६ या कालावधीत न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती स्पर्धा समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांनी दिली.

सन १९८६ मध्ये सहकार क्रीडा मंडळ, अहमदनगर यांच्या वतीने पुरुष व महिला गटातील राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर सुमारे ४० वर्षांनी पुन्हा एकदा या स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगरमध्ये होत आहे. या स्पर्धेत राज्यातील पुरुषांचे २४ आणि महिलांचे २४ असे एकूण ४८ संघ सहभागी होणार असून, सुमारे ७२० खेळाडूंसह प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, पंच, तांत्रिक समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र खो-खो संघटनेचे पदाधिकारी



उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी चार स्वतंत्र मैदाने तयार करण्यात येणार असून, दिवसा आणि रात्री विद्युत रोषणाईत सामने खेळविण्यात येतील. प्रेक्षकांसाठी तीन ते चार हजार आसनक्षमतेची गॅलरी उभारण्यात येणार आहे. सहभागी खेळाडूंच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार असून, चारही दिवस जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. स्पर्धेतील सामन्यांचे आकाशवाणी, यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि अन्य सोशल मीडिया माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी मैदान उपलब्ध करून देण्याकामी रामचंद्र दरे, विवेक भापकर, ॲड. विश्वासराव आठरे पाटील आणि जयंत वाघ यांनी सहकार्य केले आहे. पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, डॉ. सुजय विखे पाटील, नगरसेवक निखिल वारे, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव,

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे आणि महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या सहकार्याने स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आमदार संग्राम जगताप, डॉ. सुजय विखे पाटील, संघटनेचे उपाध्यक्ष सी.ए. अशोक पितळे, सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव आणि अहमदनगर जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे पाटील ▪ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

डॉ. सुजय विखे पाटील यांचा भाजप ओबीसी मोर्चाच्या वतीने सत्कार



अहिल्यानगर- अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शहरातील केशर गुलाब मंगल कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. विखे पाटील यांचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, जिल्हा सरचिटणीस संतोष म्हस्के, नगरसेवक दत्ता गाडळकर, निखिल वारे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी, जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर, अनिल गदादे यांच्यासह भाजप ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. सुजय विखे पाटील यांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी, महिला आणि युवकांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले. अल्पभूधारक शेतकरी, महिला बचत गट तसेच स्वतःचा व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करू इच्छिणाऱ्या युवकांना सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या घटकांना कर्ज मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यासाठी एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी यांनी विखे कुटुंबीयांची शेतकरी वर्गाशी असलेली नाळ अधोरेखित केली. शेतकऱ्यांच्या अडचणी आणि प्रश्नांची त्यांना जाणीव असल्याने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांनीही डॉ. सुजय विखे पाटील यांच्या चेअरमनपदाच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी वर्गाला आर्थिक बळ मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे राज्य व केंद्र शासनाच्या पातळीवरील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठीही जिल्हा बँकेच्या नेतृत्वाचा उपयोग होईल, असे त्यांनी नमूद केले.

सोमवारपासून यौगिक शुद्धीक्रिया - शंख प्रक्षालन वर्ग

अहिल्यानगर- दरवर्षीप्रमाणे दीपावली नंतर योगविद्या धाम, अनगर तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या अनेकविध आरोग्य विषयक उपक्रमांतर्गत शंख प्रक्षालन या पचन मार्गाच्या अतिशय परिणामकारक अश्या शुद्धीक्रियेच्या बॅचेस येत्या सोमवार दि १६ तारखेपासून सुरू होत आहेत.अशी माहिती योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली. पचनाच्या समस्या, बद्धकोष्ठता, ॲसिडिटी, वाढते वजन, आळस, शरीराचे जडत्व, इ अनेक विकारांवर प्रभावी उपाय म्हणजे यौगिक शुद्धीक्रिया..शंख प्रक्षालन.! वर्ग एका बॅच मधे साधारणपणे २० साधकांचा आठवडाभर योगाभ्यास करून घेतला जातो व त्यानंतर रविवारी प्रॅक्टिकल होते. हे वर्ग सकाळी ६ ते ७ व ७ ते ८.या वेळेत राम जमना बंगला, गिते हॉस्पिटल जवळ, बालिकाश्रम रोड, व योग भवन, कुष्टधाम रोड, भिस्ताबाग जवळ, सावेडी येथे घेतले जाणार आहेत. तरी या संधीचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा, असे आवाहन धर्मेंद्र सोनगरा यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मोबाईल नंबर ९४२३७२६४५६ वर संपर्क साधवा.

माथणी येथे उल्लास नवभारत साक्षरता पंधरवडानिमित्त शिक्षक सुनिल अडसूळ यांनी केली जनजागृती



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या वतीने या शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ यांनी केंद्र पुरस्कृत उल्लास साक्षरता पंधरवडा निमित्त विविध उपक्रम आयोजित करून लोकांमध्ये जनजागृती केली. माथणी येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील उपक्रम शिक्षक सुनील अडसूळ यांनी यासाठी कृतिशील सहभाग घेऊन विविध उपक्रम राबविले .भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण () २०२० मधील उद्दिष्टानुसार पंधरा वर्षे व त्यावरील वयोगटातील असाक्षर व्यक्तींना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करून देण्यासाठी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

भारत सरकारच्या निर्देशानुसार दिनांक १ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत देशभर उल्लास नवभारत साक्षरता पंधरवडा आयोजित करण्यात आला होता. हा पंधरवडा माथणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वतीने गावात व्यापक स्वरूपात व लोकसहभागातून आयोजित करण्यात आला होता .यासाठी शिक्षक सुनील अडसूळ यांनी घरोघरी जाऊन संपूर्ण गावात असाक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण पूर्ण केले. याबाबत जनजागृती करण्यासाठी संपूर्ण गावातून विद्यार्थ्यांचे प्रभात फेरी काढण्यात आली .या प्रभात फेरीतून जनतेपर्यंत नवभारत साक्षरतेबाबत विविध संदेश पोहोचवून जनजागृती केली. शिक्षक सुनील अडसूळ यांनी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमबाबत गावातील लोकांना सविस्तर मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये जनजागृती केली.गावातील सर्वेक्षणात आढळलेल्या असाक्षर व्यक्तींची शासनाच्या पोर्टलवर नोंदणी केली. तसेच स्वयंसेवकाचीही या पोर्टलवर नोंदणी केली .असाक्षर व्यक्तींना साक्षर करण्यासाठी त्यांना भाषा, गणित विषयाचे नेहमी अध्यापन केले .साक्षरतेचे महत्व पटवून देण्याबाबत निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन केले. सन २०२६-२७ ची पहिली पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आली. या चाचणीत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान या तीन घटकांचे मूल्यमापन करण्यात आले. तसेच या असाक्षरांना शिक्षक सुनील अडसूळ यांनी विविध विषयाचे मार्गदर्शन करून डिजिटल साक्षरता,कौशल्यधिष्ठित उपयुक्त शिक्षण दिले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी वसंत चेडे

आ. दातेंच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष सावंतांची घोषणा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पारनेर तालुका अध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. विद्यमान तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांचा कार्यकाल पूर्ण झाल्याने त्यांच्या जागी वसंत चेडे यांची निवड करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, महाराष्ट्र राज्य वाहतूक सेनेचे अध्यक्ष धनंजय निमसे, जिल्हा उपाध्यक्ष संदिप रोहोकले, सुभाष लोंढे, कार्याध्यक्ष पंढरीनाथ उंडे, युवकचे तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, हरिषकाका दावभट, जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, सुनिता सोबले, कविता औटी, सोनाली कुलथे, जयश्री शिंदे, रेश्मा गलांडे, नीलम गोसावी, देवराम मगर, सुभाष ठाणगे, अनिल देठे यांसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार दाते सर यांनी पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक गती देण्याच्या दृष्टीने पदाधिकाऱ्यांना विविध सूचना केल्या. गावागावांत पक्षाची संघटना अधिक मजबूत करणे, बूथस्तरावर कार्यकर्त्यांचे सक्षम जाळे निर्माण करणे, पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे, युवकांना संघटनेत सक्रिय संधी देणे तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करून जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

पक्षाच्या संघटनात्मक विस्तारासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी, जनसंपर्क वाढवावा आणि पक्षाला गावपातळीवर अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही आमदार दाते सर यांनी यावेळी केले.

''वसंत चेडे यांच्यासारख्या अनुभवी आणि संघटनात्मक कामाची जाण असलेल्या नेतृत्वाकडे पारनेर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचा निश्चितच आनंद आहे. आमदार काशिनाथ दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक मजबूत आणि गतिमान होईल, असा मला विश्वास आहे. सर्व जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी करावे. आगामी काळात पक्षाला अधिक बळकटी देत सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी प्रभावीपणे काम करावे, अशा शुभेच्छा देतो.''

- जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत

पक्षाने माझ्यावर विश्वास दाखवून तालुकाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षा उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, आ. काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांचे मनःपूर्वक आभार मानतो. आमदार दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. गावागावांत पक्षाची फळी सक्षम करणे, युवकांना संघटनेत संधी देणे आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्याचे माझे प्राधान्य राहील. सर्वांना सोबत घेऊन पक्षाला तालुक्यात अधिक बळकट करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

- नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष वसंत चेडे

एनएमएमएस परीक्षेत श्री समर्थ विद्यामंदिरचे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

गौरी दळवी आणि सात्विक दातीर यांचे उल्लेखनीय यश; संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक यशाची परंपरा कायम राखत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रशालेतील कुमारी गौरी प्रशांत दळवी आणि चिरंजीव सात्विक निशांत दातीर हे दोन्ही विद्यार्थी या परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.


राष्ट्रीय स्तरावरील या परीक्षेत यश मिळवत दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली आहे. त्यांच्या या यशामुळे प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली असून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे मान्यवर पदाधिकारी, माध्यमिक विभागाच्या शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जिल्हा बँकेत नीलेश लंकेंची पहिली एन्ट्री लक्षवेधी

मानधनाचे पाकीटही नम्रपणे नाकारले! विजयानंतर जिल्हा बँकेच्या बैठकीला उपस्थिती । प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी करून लंके रवाना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी खासदार नीलेश लंके यांची जिल्हा बँकेतील पहिलीच एन्ट्री लक्षवेधी ठरली. पारनेर सोसायटी मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून खासदार लंके गुरुवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास संचालक मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहिले. त्यांनी बैठकीच्या प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी केली आणि त्यानंतर तेथून निघून गेले. विशेष म्हणजे, स्वाक्षरीनंतर संबंधित अधिकाऱ्याने त्यांना संचालक म्हणून देय असलेले मानधनाचे पाकीट देऊ केले. मात्र, खासदार लंके यांनी दोन्ही हात जोडून नम्रपणे मानधन स्वीकारण्यास नकार दिला. त्यांच्या या कृतीची बँकेच्या वर्तुळात विशेष चर्चा रंगली.



जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पारनेर सोसायटी मतदारसंघातील लढत संपूर्ण जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधणारी ठरली होती. या अटीतटीच्या लढतीत खासदार नीलेश लंके यांनी माजी खासदार डॉ. सुजय विखे यांचे समर्थक राहुल शिंदे पाटील यांचा तब्बल २४ मतांनी पराभव केला. खासदार लंके यांना ६४ मते मिळाली, तर शिंदे पाटील यांना ४० मतांवर समाधान मानावे लागले. या विजयातून लंके यांनी पारनेर तालुक्यातील आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले.

या निवडणुकीत स्वतः डॉ. सुजय विखे यांनी लक्ष घातल्याने सुरुवातीपासूनच राजकीय प्रतिष्ठेची लढाई निर्माण झाली होती. अगदी सहलीवर पाठविण्यात आलेले मतदारही विखे समर्थकांच्या संपर्कात असल्याची चर्चा होती. त्यामुळे ही लढत केवळ लंके विरुद्ध शिंदे पाटील अशी मर्यादित न राहता अप्रत्यक्षपणे खासदार नीलेश लंके विरुद्ध माजी खासदार डॉ. सुजय विखे अशीच बनली होती.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रक्रियेत डॉ. विखे यांनी जिल्ह्यातील विविध पक्षांच्या नेत्यांना एका व्यासपीठावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या प्रक्रियेत खासदार लंके यांना बाजूला ठेवण्यात आल्याची राजकीय चर्चा होती. मात्र, या सर्व घडामोडींनंतरही लंके यांनी पारनेर मतदारसंघातील लढतीत आपले राजकीय कसब पणाला लावत विजय मिळविला. २४ मतांच्या फरकाने मिळविलेल्या या विजयाने विखे समर्थकांना मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात झाली.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी जिल्हा सहकारी बँकेच्या बैठकीसाठी खासदार लंके यांनी लावलेली उपस्थिती महत्त्वाची मानली जात आहे. बैठकीत केवळ प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी करून बाहेर पडणे आणि त्यानंतर मानधनाचे पाकीटही स्वीकारण्यास नकार देणे, या दोन्ही बाबींमुळे त्यांची जिल्हा बँकेतील पहिलीच उपस्थिती चर्चेचा विषय ठरली. निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर जिल्हा बँकेच्या राजकारणात लंके यांची पुढील भूमिका काय असणार, याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे.

चीनमधील बुद्धिबळ खेळणारा अत्याधुनिक रोबोट प्रथमच अहिल्यानगरमध्ये

शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा दिमाखात शुभारंभ; देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बुद्धिबळ खेळाच्या प्रचार आणि प्रसारासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ सोहम फिरोदिया आणि अनुष्का फीरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, मान्यवर, खेळाडू आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे चीनमधून आणण्यात आलेला अत्याधुनिक बुद्धिबळ खेळणारा रोबोट! हा रोबोट प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळाचा डाव खेळत असून, अहिल्यानगरमध्ये प्रथमच बुद्धिबळप्रेमींना रोबोटसोबत खेळण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि बुद्धिबळ यांचा संगम अनुभवण्यासाठी खेळाडू, पालक आणि नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, या स्पर्धेचे विशेष आकर्षण असलेल्या अत्याधुनिक बुद्धिबळ रोबोटसोबत खेळण्याची संधी खेळाडूंना मिळणार आहे. त्यामुळे खेळाडूंना एक आगळावेगळा अनुभव घेता येणार असून, बुद्धिबळाच्या खेळाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे.

जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, अहिल्यानगरमधून बुद्धिबळ खेळाचा प्रचार आणि प्रसार सातत्याने होत आहे. दरवर्षी संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांना मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी होतात. बुद्धिबळ खेळाडूं साठी शंभरहून अधिक बुद्धिबळ इंटरनॅशनल वुडन बोर्ड उपलब्ध करून देण्या बरोबरच आता चीनमधील अत्याधुनिक रोबोट आणण्यात आला आहे. रोबोट सोबत खेळण्या मुळे खेळाडूंचा खेळ अधिक दर्जेदार होण्यास मदत होईल. भारतामध्ये शंभरहून अधिक ग्रँडमास्टर झाले असून, अहिल्यानगर मधून ही अजुन एक ग्रँडमास्टर तयार करण्यासाठी संघटना कटिबद्ध आहे. बुद्धिबळ हा असा खेळ आहे की, तो एकट्या व्यक्तीलाही मोबाईल वर खेळता येतो. त्यामुळे बुद्धिबळाचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार व्हावा, हा आमचा मानस आहे. आधुनिक युगा नुसार बुद्धिबळा साठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



या स्पर्धेत देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. दिव-दमण, गुजरात, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल आदी राज्यांमधून खेळाडू सहभागी झाले आहेत. तसेच महाराष्ट्रातील यवतमाळ, वर्धा, ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, पुणे, सांगली, रत्नागिरी, रायगड, छत्रपती संभाजीनगर, पालघर, नाशिक, नांदेड, नागपूर, मुंबई, जालना, जळगाव, हिंगोली, धुळे, धाराशिव, चंद्रपूर, बुलढाणा, बीड आणि अकोला येथील खेळाडूंनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे खेळाडूंच्या वयोगटातील विविधता. अवघ्या साडेचार वर्षांच्या बाल खेळाडू पासून ते ८७ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटांतील बुद्धिबळपटू आपले कौशल्य पणाला लावत आहेत. चीनमधून आलेला बुद्धिबळ खेळणारा यंत्रमानव खेळाडूंशी प्रत्यक्ष डाव खेळणार असल्याने नगरमधील तसेच बाहेरगावच्या खेळाडूंना त्याच्यासोबत बुद्धिबळ खेळण्याची संधी मिळणार आहे. बुद्धिबळ खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकां साठी हा अनुभव विशेष ठरणार असल्याची माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

या वेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भगुरकर विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, संजय जोशी, मनीष जसवानी, चेतन कड, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल तापसे, शिशिर इंदुरकर, विजय चोरडिया, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, रोहिणी आडकर आदींसह खेळाडू आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

निराधार व आर्थिक दुर्बल घटकांना मिठाई आणि फराळाचे वाटप



अहिल्यानगर- शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्वाची बांधिलकी जपत गेल्या २७ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने दिवाळी पाडवा सामाजिक संवेदनशीलतेने साजरा करण्यात आला. दिवाळीचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा आणि वंचितांच्या आयुष्यातही आनंदाचे क्षण फुलावेत, या उद्देशाने भिंगार परिसरातील निराधार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना मिठाई आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात आला.भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये आयोजित या उपक्रमात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ आणि उद्योजक लॉरेन्स स्वामी यांच्या हस्ते निराधार व आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना मिठाई व फराळाचे वाटप करण्यात आले. सणासुदीच्या काळात आर्थिक परिस्थितीमुळे अनेकांना दिवाळीचा आनंद मनमुरादपणे साजरा करता येत नाही. अशा व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. याच कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देऊन वृक्षारोपण करण्यात आले. वृत्तपत्र छायाचित्रकार वाजिद शेख आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाचे पत्रकार जहीर सय्यद यांच्या हस्ते जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. सामाजिक कार्यासोबतच निसर्गाचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी ताराचंद ठोकळ, रमेश वराडे, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, दिलीप ठोकळ, मेजर दीपक धाडगे, सचिन चोपडा, संजय भिंगारदिवे, अशोक लोंढे, सखाराम अळकुटे, रतनशेठ मेहेत्रे, ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अभिजीत सपकाळ, जैद सय्यद, जालिंदर बेल्हेकर, अविनाश जाधव, सुधीर कपाळे, जोगिंदरसिंग, उमाशंकर पंडित, जालिंदर अळकुटे, जियान सय्यद, रामनाथ गर्जे, कुमार धतुरे, दीपक घोडके, सुभाष पेंढुरकर, मुन्ना वाघस्कर, अनिल सोळसे, दशरथ मुंडे, राजुशेठ चंगेडिया, प्रशांत भिंगारदिवे, पत्रकार आबिद दुल्हेखान, दिलीप गुगळे, शिरीष पोटे, योगेश चौधरी, किरण फुलारी, विशाल भामरे, जमान मुजावर आदी उपस्थित होते. उद्योजक लॉरेन्स स्वामी यांनी हरदिन मॉर्निंग ग्रुप वंचित आणि गरजूंसाठी एक आधार बनला असल्याचे सांगितले. निरोगी आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक चळवळीच्या माध्यमातून ग्रुपने सातत्याने सुरू ठेवलेले कार्य प्रेरणादायी आहे.

भिंगार राष्ट्रवादीकडून स्मृतींना उजाळा!; पाडव्याच्या निमित्ताने कार्यकर्त्यांनी जागवल्या जुन्या आठवणी

अहिल्यानगर - दिवाळी पाडवा म्हणजे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी जिव्हाळ्याचा दिवस. दरवर्षी पाडव्याच्या मुहूर्तावर अजितदादा आवर्जून कार्यकर्त्यांची भेट घेत, त्यांची आस्थेने विचारपूस करत आणि आपुलकीचा संवाद साधत असत. कार्यकर्त्यांशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आणि त्यांच्यावरील प्रेम यामुळे पाडव्याचा दिवस कार्यकर्त्यांसाठी विशेष महत्त्वाचा ठरत असे. मात्र, यंदाचा दिवाळी पाडवा त्यांच्या अनुपस्थितीत साजरा होत असताना कार्यकर्त्यांच्या मनात आठवणींचा कढ दाटून आला. याच भावनेतून भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. आमदार संग्राम जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचे स्मरण केले.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक खासदार निलेश लंके यांना राष्ट्रवादी नगर तालुकाध्यक्ष शरदभाऊ पवार व पदाधिकाऱ्यांच्या वतीने पैलवानांची मोगरी भेट

दिसायला साधे, पण कर्तृत्वाने दमदार! मोगरी फिरवून खासदार निलेश लंके यांनी दाखवली पैलवानकी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पारनेर तालुक्यातील हंगा येथे खासदार निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी फराळाच्या कार्यक्रमानिमित्त नगर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक तथा खासदार निलेश लंके साहेब यांना पैलवानांच्या पारंपरिक व्यायामाचे प्रतीक असलेली मोगरी सप्रेम भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

पारंपरिक कुस्ती संस्कृतीमध्ये मोगरीला विशेष महत्त्व आहे. मोगरी म्हणजे ताकद, मेहनत, जिद्द, चिकाटी आणि संघर्षाचे प्रतीक! याच प्रतीकात्मक भावनेतून नगर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार निलेश लंके यांना ही



मोगरी भेट दिली.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या कारभारात पारदर्शकता निर्माण व्हावी, बँकेतील कथित भ्रष्टाचाराला आळा बसावा आणि सर्वसामान्य शेतकरी, ठेवीदार व सभासदांच्या हिताचे रक्षण व्हावे, या अपेक्षेने व जिल्हा बँक पारनेर सोसायटी मतदार संघ निवडणूक जिल्ह्यातील मातब्बर साखर प्रतिष्ठेची केलेली होती म्हणून पदाधिकाऱ्यांनी ही आगळीवेगळी भेट दिली.

विशेष म्हणजे, ही मोगरी हातात घेतल्यानंतर खासदार निलेश लंके साहेब यांनी स्वतः मोगरी फिरवून दाखवली. त्यातून आपण केवळ राजकारणातीलच नव्हे, तर तालमीच्या संस्कारातून घडलेले पैलवान असल्याची झलक उपस्थितांना दाखवून दिली. त्यांच्या या कृतीने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मोगरीच्या या भेटीमागे एकच संदेश होताजशी पैलवानाची मोगरी ताकदीचे प्रतीक आहे, तशीच जिल्हा बँकेच्या कारभारात अन्याय आणि भ्रष्टाचाराविरुद्ध ठामपणे उभे राहण्याची ताकद खासदार निलेश लंके यांनी दाखवावी, हीच सर्वांची अपेक्षा!

यावेळी नगर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरदभाऊ पवार, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भरत बोडके, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अरुण मस्के, राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष रामेश्वर निमसे,राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष गणेश तोडमल, पापामिया पटेल, उद्योजक चंदुकाका पवार, वैभव कोकाटे, संतोष कोकाटे मेंबर, नवनाथ हारदे,महेंद्र शेळके व महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कांताबाई कदमांच्या वारसांना २५ लाखांची शासकीय मदत

आमदार काशिनाथ दाते सरांच्या हस्ते धनादेश सुपूर्द



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– देऊळगाव सिद्धी ता. नगर येथील श्रीमती कांताबाई जगन्नाथ कदम (वय ६७) यांचा रानडुकराच्या हल्ल्यात ३० जुन २०२६ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर शासनाच्या वतीने त्यांच्या वारसदारांना मंजूर करण्यात आलेली २५ लाख रुपयांची आर्थिक मदत आज पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते त्यांचे पती जगन्नाथ नारायण कदम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. शासनाच्या नियमानुसार मंजूर झालेल्या या मदतीपैकी १५ लाख रुपये मुदत ठेवीच्या (एफडी) स्वरूपात ठेवण्यात आले असून, उर्वरित १० लाख रुपयांचा धनादेश लाभार्थी जगन्नाथ कदम यांना प्रदान करण्यात आला. यावेळी अहमदनगर वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, वन परिमंडळ अधिकारी आर. बी. घाटेसाव, वनरक्षक अशोक गाडेकर, लाभार्थी जगन्नाथ नारायण कदम, त्यांचे पुत्र बापू जगन्नाथ कदम, दत्तात्रय विश्वनाथ वाघमोडे, सरपंच प्रभाकर बोरकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

रानडुकराच्या हल्ल्यात श्रीमती कांताबाई कदम यांचा झालेला मृत्यू ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जीवितहानी झाल्यास शासनाच्या नियमानुसार संबंधित कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात येते. त्यानुसार कदम कुटुंबाला २५ लाख रुपयांची मदत मंजूर करून आज वितरित करण्यात आली आहे. वन विभागाकडून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात असून, वन्यप्राणी आणि मानव यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी नागरिकांनीही सतर्कता बाळगावी. वन्यप्राण्यांचा वावर आढळल्यास तातडीने वन विभागाशी संपर्क साधावा.

–वनपरिक्षेत्र अधिकारी
श्री. अविनाश तेलोरे

रानडुकराच्या हल्ल्यात श्रीम. कांताबाई कदम यांचा झालेला मृत्यू अत्यंत दुर्दैवी असून, या घटनेमुळे कदम कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. दुःखाच्या या प्रसंगी पीडित कुटुंबाला आर्थिक आधार मिळणे गरजेचे होते. शासनाच्या माध्यमातून मंजूर झालेली २५ लाख रुपयांची मदत आज त्यांच्या वारसदारांकडे सुपूर्द करण्यात आली आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, यासाठी वन विभागाने आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवाव्यात. पीडित कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी असून, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत.

– आमदार काशिनाथ दाते सर
(विधानसभा सदस्य)

विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते 'सुजित पेट्रोलियमचा' उद्घाटन समारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– एमआयडीसी बायपास रोडवरील वडगाव गुप्ता येथील सुजित पेट्रोलियम या पेट्रोल पंपाचा उद्घाटन समारंभ विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचे शुभहस्ते पाडव्याच्या शुभमुहूर्तावर झाला.

याप्रसंगी मा.खा.सुजयदादा विखे पाटील, आ. संग्राम जगताप,आ.अक्षय कर्डिले, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष मनपा नगरसेवक संपत बारस्कर, बाळासाहेब बारस्कर, लोभाजी कातोरे, मार्केट कमिटी संचालक पै. संदीपदादा कर्डिले, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष पै. रोहिदास कर्डिले, वडगाव गुप्ताचे सरपंच विजुभाऊ शेवाळे, माजी सरपंच भानुदास सातपुते, बुऱ्हाणनगरचे सरपंच रावसाहेब कर्डिले, पुजा कार एसी अँड मल्टी कार सर्व्हिस स्टेशनचे संजय वाघ , मंगल वाघ, सुजित वाघ व पुजा वाघ,।सामाजिक कार्यकर्ते राजुमामा तागड,



राजेंद्र तोडमल, कंपनीचे सेल्स मॅनेजर जय मितवा आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी राम शिंदे म्हणाले, वाघ परिवाराने अतिशय गरीबीतून व्यवसाय सुरू केला असून मल्टीकार सर्विस स्टेशन व पेट्रोलपंप या क्षेत्रात त्यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे. वाघ परिवाराने जिद्द, चिकाटी, मेहनत करण्याची क्षमता आणि प्रामाणिकपणा या गुणामुळे आपल्या उद्योग व्यवसायात अगदी शून्यातून गगन भरारी घेतली आहे. म्हणून तरुणांनी व्यवसायाकडे वळावे असे मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले व या व्यवसायासाठी त्यांनी वाघ परिवारास शुभेच्छा दिल्या. आ. संग्राम जगताप यांनी, एक कार मकेनिक ते दोन पेट्रोल पंपाचे संचालक हा संजय वाघ यांचा प्रवास नवीन तरुण पिढीसाठी प्रशंसनीय आहे. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा यावर लोकांचा विश्वास संपादन केल्यास कोणत्याही व्यवसायात यशस्वी होता येते असे आ. जगताप यांनी यावेळी सांगितले.

दिवाळी पाडवा व नूतन वर्षानिमित्त चिचोंडी पाटील ग्रामपंचायतीमध्ये पारंपरिक पानसुपारी कार्यक्रम उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– थोर अन्नदाते महादजी पाटील यांच्या काळापासून सुरू असलेली ही परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने जपली जात आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध सेवा संस्थांचे चेअरमन व व्हाईस चेअरमन, आजी-माजी पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सरपंच शरदभाऊ पवार, उपसरपंच विश्वसागर कोकाटे, माजी उपसरपंच महेश पाटील जगताप,ज्येष्ठ नेते आबासाहेब कोकाटे सर,आप्पासाहेब पवार, सोसायटीचे चेअरमन दिलीप पवार,व्हाईस चेअरमन बबन कोकाटे,माझी चेअरमन



महादेव खडके,सुरेश ठोंबरे,ज्येष्ठ नागरिक संघाचे पवार सर,करंडे गुरुजी, कल्याण पाटील जगताप,गटनेते वैभव कोकाटे, अर्जुन वाडेकर,पंडित कोकाटे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते विलास दवणे, अरुण दवणे, डॉक्टर मारुती ससे, डॉक्टर ययाती फिसके, उद्योजक चंदूकाका पवार,संतोष कोकाटे मेंबर,प्राध्यापक विजय कोकाटे सर, मुख्याध्यापक प्रकाश ठोंबरे सर,बेग सर,युवानेते विशाल आगलावे,युवराज हजारे,दत्तू कोकाटे, माऊली ठोंबरे,कैलास कानडे,दत्तू धुळे या मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. व यावेळी उपस्थित मान्यवरांनी एकमेकांना दिवाळी पाडवा व नूतन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच गावातील गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. गावातील सामाजिक सलोखा, एकोपा, बंधुभाव आणि ऐतिहासिक परंपरा जपणारा हा पानसुपारी कार्यक्रम आनंदी व उत्साही वातावरणात संपन्न झाला. परंपरेचा वारसा जपत, एकोप्याची भावना वृद्धिंगत करणारा हा दिवाळी पाडवा कार्यक्रम चिचोंडी पाटीलच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणारा ठरला.

एसबी रिअल्टीने अभिनेता शरद केळकर यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती

'स्पेसेस दॅट ब्रीद' ही नवीन जाहिरात मोहीम सुरू केली । पुण्यातील या रिअल इस्टेट क्षेत्रातील कंपनीच्या नवीन जाहिरातीत शरद केळकर दिसणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील कंपनी एसबी रिअल्टी ने अभिनेता शरद केळकर यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच 'स्पेसेस दॅट ब्रीद' ही नवीन ब्रँड मोहीम सुरू केली आहे. नैसर्गिक प्रकाश, हवा खेळती राहणे, हरित परिसर आणि मोकळ्या जागा या संकल्पनांवर ही मोहीम आधारित आहे. घर किंवा कामाच्या ठिकाणाची रचना माणसांच्या दैनंदिन जीवनावर कसा परिणाम करते, तसेच त्यांना आराम करण्यासाठी आणि आपल्या जवळच्या व्यक्तींसोबत वेळ घालवण्यासाठी कशी मदत करते, हे दाखवण्यात आले आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रातील सहा वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या एसबी रिअल्टीने पुण्यात आतापर्यंत १० लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे प्रकल्प पूर्ण केले आहेत. सध्या २० लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहेत, तर ५० लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे प्रकल्प आगामी काळात सुरू होणार आहेत.

विविध भाषांमधील राष्ट्रीय चित्रपटसृष्टी आणि टेलिव्हिजनमध्ये विविध मालिकांमध्ये काम केल्यामुळे शरद केळकर यांनी प्रादेशिक तसेच देशभरातील वेगवेगळ्या वयोगटांतील प्रेक्षकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे. पडद्यावरील प्रभावी अभिनयासोबतच त्यांचा साधेपणा आणि आपलेपणा प्रेक्षकांना भावतो. विश्वास, आकांक्षा आणि नात्यांमधील जिव्हाळा या एसबी रिअल्टीच्या मूल्यांशी त्यांचे व्यक्तिमत्त्व जुळणारे आहे. चित्रपटांचे शूटिंग, प्रवास आणि विविध कामांमुळे शरद केळकर यांचे आयुष्य सतत धावपळीचे असते. त्यामुळे दिवसभराच्या धावपळीतून थोडा वेळ काढून घरी शांतपणे राहता येईल, अशा घराचे महत्त्व त्यांच्या जीवनशैलीतूनही



दिसून येते हाच विचार या मोहिमेत मांडण्यात आला आहे. या जाहिरात चित्रपटात शरद केळकर बाहेरच्या धावपळीच्या जगापासून दूर जाऊन घरातील आरामदायी वातावरणाचा आनंद घेताना दिसतात. झोपाळ्यावर बसून पुस्तक वाचणे, घराबाहेरील मोकळ्या जागेत वेळ घालवणे आणि कुटुंबासोबत आनंदाचे क्षण अनुभवणे अशा साध्या गोष्टींमधून घराला खऱ्या अर्थाने घरपण कसे मिळते, हे दाखवण्यात आले आहे.

या छोट्या-छोट्या प्रसंगांतून मोहिमेत दोन गोष्टींवर भर देण्यात आला आहे. एक म्हणजे घरातील नैसर्गिक प्रकाश, शुद्ध हवा आणि मोकळ्या जागा, तर दुसरी म्हणजे घरात आल्यावर मिळणारी मनःशांती आणि मोकळेपणाची भावना. एसबी रिअल्टीच्या 'ऑक्सिजनेटेड होम्स' या घरांच्या रचना संकल्पनेतून ही कल्पना मांडण्यात आली आहे. या संकल्पनेत घरात हवा खेळती राहावी, नैसर्गिक प्रकाश मिळावा आणि हिरवळीने वेढलेल्या मोकळ्या जागा असाव्यात, याला प्राधान्य दिले जाते. केवळ घरांसाठीच नव्हे, तर कंपनीच्या कार्यालये आणि व्यावसायिक जागांच्या रचनेतही हाच विचार वापरला जातो. या जागा उपयुक्त, मोकळ्या आणि त्यांचा रोज वापर करणाऱ्या लोकांसाठी आरामदायी असाव्यात, यावर भर दिला जातो. या भागीदारीबद्दल बोलताना एसबी रिअल्टीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनुज अग्रवाल म्हणाले, ''चांगल्या पद्धतीने तयार केलेल्या जागेचे खरे महत्त्व तिथे राहणाऱ्या लोकांच्या दैनंदिन जीवनात किती चांगला बदल घडतो, यावर ठरते. दिवसभराच्या धावपळीनंतर लोक आपल्याघरी परततात, तेव्हा त्यांना कसे वाटते, हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. नैसर्गिक प्रकाश, शुद्ध हवा, हिरवळ आणि योग्य नियोजनातून तयार केलेल्या मोकळ्या जागा यामुळे घर अधिक आरामदायी आणि आनंददायी बनते.''

''हीच विचारसरणी आमच्या 'स्पेसेस दॅट ब्रीद' या मोहिमेमागे आहे. त्यामुळे शरद केळकर यांची या अभियानासाठी निवड करणे स्वाभाविक होते. कारण व्यस्त व्यावसायिक जीवनातही कुटुंबासाठी वेळ काढणे आणि घरात आराम व समाधान मिळवणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांना समजते. या मोहिमेद्वारे घराला खास बनवणाऱ्या छोट्या-छोट्या गोष्टींकडे आम्हाला लोकांचे लक्ष वेधायचे आहे. तसेच, विचारपूर्वक डिझाइन करून तयार केलेली जागा दैनंदिन जीवन अधिक चांगले आणि आनंददायी कसे बनवू शकते, हेही दाखवायचे आहे.''

आपले विचार व्यक्त करताना शरद केळकर म्हणाले, ''शूटिंग आणि प्रवास यामुळे मी नेहमी व्यस्त असतो. त्यामुळे घरात मिळणारा वेळ माझ्यासाठी खूप मौल्यवान असतो. घरी आल्यावर मी कामाचा ताण बाजूला ठेवतो, कुटुंबासोबत वेळ घालवतो आणि छोट्या-छोट्या गोष्टींचा आनंद घेतो. 'स्पेसेस दॅट ब्रीद' ही मोहीमहीच भावना व्यक्त करते. घर केवळ दिसायला सुंदर असणे महत्त्वाचे नाही, तर तिथे गेल्यावर आपल्याला कसे वाटते, हेही अधिक महत्त्वाचे आहे. हा विचारइतक्या सोप्या पद्धतीने मांडणाऱ्या मोहिमेचा भाग होताना मला आनंद होत आहे.''

ही मोहीम वर्षअखेरीपर्यंत पुणे शहरात रेडिओ, जाहिरात फलक, चित्रपटगृहे, विमानतळ आणि डिजिटल माध्यमांद्वारे राबवले जाणार आहे. या मोहिमेतील ब्रँड फिल्मच्या माध्यमातून डिजिटल प्रचारावर विशेष भर दिला जाणार आहे. जानेवारी २०२७ मध्ये ही मोहीम क्रेडाई () पर्यंत विस्तारली जाणार असून, त्यावेळी ब्रँड आणि त्यांच्या प्रकल्पांनुसार मोहिमेत आवश्यक बदल केले जातील. मोहिमेची फिल्म पाहण्यासाठी: https://youtu.be/Ze_L1LIg0wg?si=sUNYBpoTnRKHfLrG

एसबी रिअल्टी विषयी

एसबी रिअल्टी ही पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील कंपनी आहे. लोकांचे दैनंदिन जीवन अधिक चांगले व्हावे आणि व्यवसायासाठी चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी कंपनी निवासी आणि व्यावसायिक इमारतींचे नियोजनबद्ध बांधकाम करते. १९६० मध्ये पुण्यात सुरू झालेल्या कौटुंबिक व्यवसायाचा वारसा कंपनीला लाभला आहे. रिअल इस्टेट क्षेत्रात कंपनीला सहा वर्षांहून अधिक अनुभव आहे. आतापर्यंत कंपनीने १० लाख चौरस फुटांहून अधिक बांधकाम पूर्ण केले आहे. सध्या २० लाख चौरस फुटांहून अधिक क्षेत्रफळाचे प्रकल्प सुरू असून, ५० लाख चौरस फुटांहून अधिक क्षेत्रफळाचे नवीन प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत. कंपनीच्या निवासी प्रकल्पांमध्ये अदीरा, अझुरा आणि मिझुरा यांचा समावेश आहे. तर ४१ सिटी हब, एसबी रिअल्टी स्क्वेअर आणि अदीरा हायस्ट्रीट हे कंपनीचे व्यावसायिक प्रकल्प आहेत. याशिवाय, स्टुडिओ लिव्हिंगची सुविधा देणारा सोशियो हा प्रकल्पही कंपनीने सुरू केला आहे. अपर खराडी आणि मध्य पुणे येथे कंपनीचे नवीन प्रकल्प येणार आहेत. यामुळे पुण्यातील आपला व्यवसाय अधिक वाढवण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. 'स्पेसेस दॅट ब्रीद' या संकल्पनेनुसार, घर, ऑफिस आणि व्यावसायिक जागांमध्ये नैसर्गिक प्रकाश, खेळती हवा, मोकळ्या जागा, हिरवळ आणि योग्य सोयी असाव्यात, यावर कंपनी भर देते. लोकांना आरामदायी आणि चांगले वातावरण मिळावे, हा यामागील उद्देश आहे.

कष्टकऱ्यांच्या दिवाळीत ज्ञानरचना फाउंडेशनने फुलविला आनंदाचा गोडवा!

भिंगारमधील काच, कागद आणि भंगार गोळा करून उदरनिर्वाह करणाऱ्या गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप । सामाजिक बांधिलकीतून माणुसकीचा दिवा उजळला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– कोणासाठी दिवाळी म्हणजे रोषणाई, फराळ, नवीन कपडे आणि आनंदाचा उत्सव; तर कोणासाठी दोन वेळच्या अन्नाची भ्रांत मिटविण्याची धडपड! रोज काच, कागद आणि भंगार गोळा करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकरी कुटुंबांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद फुलावा, त्यांच्या घरातही सणाचा गोडवा निर्माण व्हावा, या संवेदनशील भावनेतून ज्ञानरचना सोशल फाउंडेशनने माणुसकीचा अनोखा दीप प्रज्वलित केला. फाउंडेशनच्या वतीने भिंगार परिसरातील गरजू कुटुंबांना दिवाळी फराळ तयार करण्यासाठी आवश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

दिवाळीच्या सणात प्रत्येक घरात आनंदाचे वातावरण असते. मात्र, समाजातील काही कुटुंबांना आर्थिक परिस्थितीमुळे सणाचा आनंदही मर्यादित स्वरूपात साजरा करावा लागतो. विशेषतः काच, कागद आणि भंगार संकलित करून मिळणाऱ्या उत्पन्नावर संसाराचा गाडा ओढणाऱ्या कुटुंबांचा संघर्ष मोठा असतो. दिवसभर कष्ट करूनही त्यांच्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा पूर्ण करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कष्टकरी कुटुंबांच्या जगण्यातील संघर्षाची जाणीव ठेवून त्यांच्या दिवाळीत आनंदाचे चार क्षण निर्माण करण्यासाठी ज्ञानरचना सोशल फाउंडेशनने सालाबादप्रमाणे यंदाही हा सामाजिक उपक्रम राबविला.

ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सौ. सुप्रिया चौधरी आणि सारिका शेलार यांच्या हस्ते गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. दिवाळीचा फराळ तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने या कुटुंबांनाही सण साजरा करण्यासाठी मोलाचा आधार मिळाला. मदतीचे स्वरूप केवळ किराणा साहित्यापुरते मर्यादित नसून, समाजातील कष्टकरी घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची आणि त्यांच्याप्रती आपुलकी व्यक्त करण्यात आली.

समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे म्हणजे केवळ वस्तूंचे वाटप करणे नव्हे, तर त्यांच्या संघर्षाची दखल घेऊन त्यांना आपणही समाजाचा महत्त्वाचा घटक आहोत, ही जाणीव करून देणे होय. कष्टकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे, त्यांच्या मुलांनाही दिवाळीचा आनंद अनुभवता यावा आणि त्यांच्या घरातही फराळाचा गोडवा दरवळावा, या भावनेतून फाउंडेशनने पुढाकार घेतला.

ज्ञानरचना सोशल फाउंडेशन मागील चार वर्षांपासून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. केवळ तात्पुरती मदत करण्यापेक्षा गरजू व्यक्तींना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांना वाव देणे, महिलांना सक्षम करणे आणि समाजातील गुणवंतांच्या कार्याला प्रोत्साहन देणे, हा फाउंडेशनच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे.

याअंतर्गत शैक्षणिक क्षेत्रात गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी 'एज्युकेशनल मटेरियल बँक', महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी 'महिला सक्षमीकरण व कौशल्य विकास', विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी 'कर्तृत्वाचा सन्मान', गरजू कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यासाठी 'दिवाळी आनंदोत्सव', कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'दीपसंध्या' हा सांस्कृतिक उपक्रम तसेच गरजू आणि वंचित घटकांना मदतीचा हात देणारे विविध सामाजिक उपक्रम वर्षभर राबविण्यात येतात.

शिवमहापुराण ही मानवी जीवनाला संस्कार, सदाचार आणि सकारात्मक विचारांची दिशा देणारी जीवनसृष्टी - पालकमंत्री

श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर व साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने शिवमहापुराण कथा सप्ताहाचा प्रारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– शिवमहापुराण ही केवळ धार्मिक ग्रंथकथा नसून मानवी जीवनाला संस्कार, सदाचार आणि सकारात्मक विचारांची दिशा देणारी जीवनसृष्टी आहे. भगवान शिव हे त्याग, तपस्या, करुणा, संयम आणि समतेचे प्रतीक आहेत. 'शिव' या शब्दाचा अर्थच कल्याण असून समाजातील प्रत्येक घटकाचे कल्याण व्हावे, हीच शिवतत्त्वाची शिकवण आहे. भगवान शिवांच्या विचारांत भेदभावाला स्थान नाही. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यामुळे हा शिवमहापुराण कथा सप्ताह सामाजिक समरसतेचा संदेश देणारा ठरेल, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

दिल्ली गेट येथे श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या वतीने तसेच उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून या कथेचे निरूपण होत आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, , माजी उपमहापौर अनिल बोरुडे, विनायक देशमुख, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, ऋग्वेद गंधे, दत्ता गाडळकर, रोहन सानप, जालिंदर कोतकर, अभिजीत बोरुडे, मयूर बांगरे, संजय ढोणे, सुशांत जाधव, रवींद्र बारस्कर, जितू गंभीर,रोहन सानप, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप,गटनेते शारदाताई ढवन मा. नगरसेविका सुप्रिया जाधव आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी कै. कृष्णाभाऊ जाधव यांच्या विचारांचा वारसा धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून पुढे घेऊन जाण्याचे काम केले आहे. त्यांनी शहरात 'हरित नगर' ही संकल्पना राबवून पर्यावरण संतुलनाचा संदेश दिला आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरात चांगले काम सुरू आहे.

भगवान शिवांचे ध्यान, तपस्या आणि आत्मसंयम युवकांना व्यसनमुक्ती, शिस्त आणि ध्येयपूर्तीचा संदेश देतात. सध्याच्या परिस्थितीत हे संस्कार आचरणात आणण्याची खरी आवश्यकता आहे. अशा कथा सोहळ्यांमुळे नवीन पिढीला भारतीय आध्यात्मिक परंपरा, संस्कार आणि सांस्कृतिक वारशाची ओळख होईल. धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक भेदभाव दूर करून सद्विचार व सामाजिक एकोपा वाढविण्याचा संकल्प या शिवमहापुराण कथेतून केला जात आहे.

शिवमहापुराण कथेचे केवळ श्रवण न करता तिच्यातील विचार आपल्या आचरणात आणूया. भगवान महादेवांच्या विचारांची प्रेरणा घेऊन संस्कारक्षम आणि सेवाभावी समाज निर्माण करूया. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या वाणीतून यापूर्वी श्री साईबाबांची कथा आणि आता शिवमहापुराण कथेचे आयोजन करून धार्मिक कार्याचा प्रसार व प्रचार केला जात आहे, असेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

आयोजक उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, सिद्धी बागेतील सिद्धेश्वर महादेव मंदिर हे प्राचीन मंदिर असून जागृत देवस्थान म्हणून त्याची ओळख आहे. यानिमित्त कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून शिवमहापुराण कथेला प्रारंभ झाला आहे. कथा श्रवणासाठी येणाऱ्या भाविकांना बसण्यासाठी दहा हजार खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली असून महाप्रसादाचेही आयोजन केले आहे.

पुढील पिढीला केवळ संपत्तीच नव्हे, तर धार्मिक आणि नैतिक संस्कारांचा वारसा मिळावा, या उद्देशाने शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने उत्साहात मिरवणूक काढून कथेला प्रारंभ करण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी शिवमहापुराण कथेचे आयोजन करून धार्मिकतेचा वारसा जोपासण्याचे काम केले आहे. पुढील पिढीला आध्यात्मिक आणि धार्मिक विचारांची खरी गरज आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणे आवश्यक आहे.

नेप्तीत ६९ लाखांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात नगर तालुक्यातील ४३ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण स्वतः लक्ष घालून शासनाच्या माध्यमातून आतापर्यंत २० ते २२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून विविध विकासकामे मार्गी लावली आहेत. नगर तालुक्याच्या विकासाला आपण सातत्याने प्राधान्य दिले असून, विकासकामांच्या बाबतीत कार्यकर्त्यांनी निश्चिंत राहावे. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून, यापुढेही गावागावांतील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही आमदार काशिनाथ दाते सर यांनी नेप्ती येथिल ६९ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी दिली.

नेप्ती गावातील रस्ते व पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या सहा विकासकामांचा यामध्ये समावेश आहे. यामध्ये कल्याण बायपास ते बाबासाहेब होळकर घर रस्ता (१० लाख), पोपट जपकर घर ते बाबासाहेब होळकर घर रस्ता (१० लाख), नेप्ती बायपास रस्ता सुधारणा (१८ लाख), स्मशानभूमी ते सय्यद वस्ती रस्ता सुधारणा (१८ लाख), राम मा-६१ ते रावळे वस्ती रस्ता (५ लाख) आणि कृष्णवाडी रस्ता (८ लाख) या कामांचा समावेश आहे.

यावेळी बोलताना आमदार दाते सर यांनी नगर तालुक्यातील विकासकामांचा आढावा घेतला. सोनेवाडी येथे नुकत्याच झालेल्या रस्त्याच्या कामाच्या उद्घाटनाचा तसेच विधानसभा निवडणुकीनंतर हिंगणगाव येथे एक कोटी रुपयांच्या निधीतून मार्गी लावलेल्या विकासकामांचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. नगर तालुक्यातील कार्यकर्ते विकासकामांच्या बाबतीत समाधानी असून, लोकांच्या अपेक्षेनुसार विकासाचा हा प्रवास यापुढेही सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अरुणराव होळकर, जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत दादा गायकवाड, माजी सरपंच विठ्ठल जपकर, सरपंच सविता संजय जपकर, उपसरपंच बंडू जपकर, उद्योजक बापू सोनवणे, माजी सरपंच संजय जपकर, उद्योजक संजय जपकर, चेअरमन उमर सय्यद, व्हा. चेअरमन भाऊसाहेब होळकर, माजी उपसरपंच बाबासाहेब होळकर, माजी चेअरमन अशोक जपकर, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर जपकर यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या नगर तालुक्यातील ४३ गावांमध्ये पारनेरच्या बरोबरीने किंबहुना त्याहूनही अधिक प्रमाणात विकासकामे होत असल्याचे मोठे समाधान आहे. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाची निर्मिती झाल्यापासून प्रथमच एखाद्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून नगर तालुक्यातील गावांना विकासकामांच्या बाबतीत खऱ्या अर्थाने न्याय मिळत असून, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आ. दाते सर यांच्या कामाच्या झपाट्यामुळेच त्यांची संपूर्ण मतदारसंघात 'कामाचा माणूस' अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. नेप्ती गावातील विकासकामांचा हाच वेग कायम राहिला, तर आगामी तीन वर्षांत गावातील एकही रस्ता विकासकामांपासून वंचित राहणार नाही, असा मला ठाम विश्वास आहे.

अरुणराव होळकर,
माजी जि.प. सदस्य अहिल्यानगर

(पान १ वरून)

महिलांची टोळी पाठवून ताबेमारीचा प्रयत्न

(वय ४२, रा. डॉन बॉस्को हायस्कूल शेजारी, भोरमळा, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. भोर यांच्या घराशेजारील सर्व्हे नंबर २५५/१ अ मधील ५५३.१२ चौरस मीटर जागा अमोल दिलीप निक्रड (रा. गणेश चौक, बोल्हेगाव) याने विकत घेतली आहे. मात्र, ही जागा आपली वडिलोपार्जित वस्तीपाटाची असल्याचा भोर यांचा दावा असून, त्यांनी तेथे बांबू व ताडपत्रीचे शेड उभारले होते. दिनांक ११ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास निक्रड याच्या सांगण्यावरून २० ते २५ अनोळखी महिला कुऱ्हाड व इतर हत्यारांसह भोर यांच्या जागेत घुसल्या व त्यांनी शेड तोडण्यास सुरुवात केली. भोर यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, महिलांनी त्यांना शिवीगाळ करत विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. भोर यांनी तातडीने ११२ वर कॉल करून पोलिसांना बोलावले. पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतरही महिलांनी तोडफोड सुरूच ठेवली. एवढेच नाही तर, पोलिसांसमोरच स्वतःचे कपडे फाडून व स्वतःला मारहाण करून घेत जखमी करून घेतले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून अतिरिक्त पोलीस कुमक मागवण्यात आली व महिलांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेण्यात आले. या प्रकरणी महिला व मुख्य आरोपी अमोल निक्रड याच्यावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चाहेर करत आहेत.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाला सुप्रिया सुळें यांच्याकडून पूर्णविराम

केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सत्तेत होण्याचा विषयचं येत नाही, असंही सुप्रिया सुळेंनी स्पष्ट केलं आहे. अजित पवार गटातून कुणाचाही प्रस्ताव आलेला नाही, फोन, मेसेज काहीही आलेलं नाही. माझा भाऊ गेला त्यावेळी सगळा विषय संपला आहे, असं सुप्रिया सुळेंनी सांगितलं आहे

एलसीबीचे एकाच दिवशी जिल्ह्यात १६ ठिकाणी छापे

रोख रक्कम, तसेच हजारो रुपयांची अवैध दारू आणि शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा जप्त केला आहे. कर्जतमध्ये जुगार, दारू व गुटखा अशा चार कारवायांत सुमारे ६६ हजारांचा, तर पारनेरमध्ये पाच कारवायांत ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल पकडण्यात आला. यासोबतच तोफखाना, राहुरी व लोणी हद्दीतही कारवाई करण्यात आली.

कामगार युनियनचा २३ नोव्हेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

तसेच भविष्य निर्वाह निधीची कपात करूनही संबंधित रक्कम कर्मचाऱ्यांना वेळेवर मिळत नाही. सोसायटीची कपात केलेली रक्कम वेळेवर जमा केली जात नाही. मागील दीड वर्षापासून वैद्यकीय परिपूर्तीची बिले अदा करण्यात आलेली नाहीत. एल.आय.सी.चे हप्ते वेतनातून कपात करूनही ते वेळेवर एल.आय.सी.कडे वर्ग केले जात नाहीत. याशिवाय सर्व कायम कामगार-कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाची रक्कमही अद्याप अदा करण्यात आलेली नसल्याचे युनियनने म्हटले आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या या सर्व थकीत रकमा सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची देणी प्रलंबित असताना केवळ वसुलीचे कारण पुढे करून सण अग्रीम नाकारणे ही कामगार-कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी कृती असल्याचे युनियनने म्हटले आहे. महानगरपालिका प्रशासनाच्या अडचणी समजून घेऊन युनियनने वेळोवेळी चर्चा करून सहकार्याची भूमिका घेतली आहे. मात्र, सण अग्रीम आणि कर्मचाऱ्यांची सर्व थकीत देणी देण्याबाबत ठोस कार्यवाही होत नसल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार २३ नोव्हेंबर २०२६ पासून महानगरपालिका कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका प्रशासनावर राहील, असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

तब्बल ४० वर्षांनंतर अहिल्यानगरमध्ये राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचा थरार

उपस्थित राहणार आहेत. समारोप व पारितोषिक वितरण समारंभ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

अहमदनगर जिल्हा खो-खो संघटनेची स्थापना १९७२ मध्ये कै. पी.के. रत्नपारखी, दिनुभाऊ कुलकर्णी, व्ही.ए. निवसरकर, एम.व्ही. बर्डे आणि बी.आर. मोरे यांनी केली. त्यानंतर डॉ. विलास कवळे, अशोक पितळे आणि निर्मलचंद्र थोरात यांनी संघटनेचे कामकाज पाहिले. सध्या ॲड. विश्वासराव आठरे पाटील, विकास परदेशी आणि गौरव पितळे हे संघटनेची जबाबदारी सांभाळत आहेत. खो-खो क्षेत्रात अहमदनगर जिल्ह्याची गौरवशाली परंपरा असून, जिल्ह्याने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविले आहेत. पुरुष गटातील एकलव्य पुरस्कार निर्मलचंद्र थोरात, कुमार गटातील वीर अभिमन्यू पुरस्कार आदित्य कुदळे व तेजस मगर, तर किशोर गटातील भरत पुरस्कार राहुल चव्हाण यांनी प्राप्त केला आहे. महिला गटात राणी लक्ष्मीबाई पुरस्कार श्वेता गवळी, कुमारी गटातील जानकी पुरस्कार नंदिनी देशमुख व श्वेता गवळी, तर किशोरी गटातील वीरबाला पुरस्कार श्वेता गवळी व मयुरी मुत्याल यांनी मिळविला आहे.

निर्मलचंद्र थोरात, श्वेता गवळी, मयुरी मुत्याल आणि निकिता मरकड यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्र संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. सुधीर चपळगावकर यांनी आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुणे विद्यापीठ संघाचे नेतृत्व केले आहे. पुरुष गटात अशोक पितळे, नंदकुमार पवार, निर्मल थोरात, श्रीकांत निंबाळकर, सुधीर चपळगावकर, विकास परदेशी आणि आदित्य कुदळे, तर महिला गटात विद्या जोगळेकर, नंदिनी कुलकर्णी, सुरेखा काबरा, मुक्ता गायकवाड, वंदना देशमुख, वैशाली बोतर्डीकर, कीर्ती गुंदेचा, अंजली लांडगे, नंदा शेलार, श्वेता गवळी, मयुरी मुत्याल आणि निकिता मरकड यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील खो-खो खेळाडूंनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासह विविध प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त केले आहेत. जिल्ह्यात हा पुरस्कार सर्वप्रथम निर्मलचंद्र थोरात यांना मिळाला, तर त्यानंतर श्वेता गवळी हिनेही हा बहुमान मिळविला. श्वेता गवळी हिने दक्षिण आशियाई स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले आहे. खो-खोच्या विविध वयोगटांत महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची कामगिरीही तिने केली आहे.

नगर शहरासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये खो-खो खेळ लोकप्रिय असून ग्रामीण भागातील खेळाडूही राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. यापूर्वी १९८२ मध्ये प्रवरानगर येथे ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि राजेंद्र विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली फेडरेशन कप आणि सब-ज्युनियर राष्ट्रीय खो-खो स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

चार दशकांनंतर अहिल्यानगरमध्ये होत असलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींना राज्यातील नामवंत खेळाडूंचा खेळ प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे. मैदानी खेळांमुळे शरीर स्वास्थ्य सुदृढ राहत असल्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना जास्तीत जास्त मैदानी खेळांकडे प्रोत्साहित करावे, यशस्वी क्रीडापटूंना शासन स्तरावर अनेक करिअरच्या संधी उपलब्ध असल्याचे यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

यावेळी ॲड विश्वासराव आठरे, प्रा सुनील जाधव, सुमतीलाल कोठारी, गौरव पितळे यांसह खेळाडू उपस्थित होते. यावेळी स्पर्धेच्या बोधचिन्हाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.